बीड । बुधवार
२३.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : २३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# तुमची मुलगी मला द्या, गुंडाची शिक्षकाला धमकी, ट्रॅक्टर थेट गाडीवर चढवला!

केज । प्रतिनिधी

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर संपूर्ण बीड जिल्हा राज्यात नव्हे तर देशात चर्चेत आला आहे. दरम्यान, बीडची गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असतानाच, बीडच्या केज तालुक्यातील वरपगाव येथून आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'तुमची मुलगी मला द्या..' असे म्हणत शिक्षकालाच एका गावगुंडाने जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे. हे प्रकरण उजेडात आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून अद्याप या प्रकरणी कुणावरही गुन्हा दाखल झालेला नसल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार बंदुकीच्या धाकावर करण्यात आला असल्याचा आरोप शिक्षकाच्या नातेवाईकांनी केलाय. केज तालुक्यातील वरपगाव येथील एका विद्यालयासमोर दिवसाढवळ्या हा धक्कादायक प्रकार घडला आहे. हे गावगुंड इथवरच थांबले नाहीत, तर यानंतर शिक्षकाच्या गाडीवर ट्रॅक्टर घालत मोठे नुकसान देखील केलंय. बाजीराव डोईफोडे असे या शिक्षकाचे नाव असून शिक्षकावर बीडच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणात अद्याप कुणावरही पोलीसात गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली असून बीड जिल्ह्याचे नाव आणि इथली गुन्हेगारी नव्याने चर्चेत आली आहे.





### • पो. अधीक्षकांची भेट घेणार, न्याय न मिळाल्यास आत्मदहन

या मारहाण प्रकरणी शिक्षकाच्या नातेवाईकांनी गंभीर आरोप करत आपण पोलीस अधीक्षकांची भेट घेणार असल्याची माहिती दिली आहे. तर न्याय न मिळाल्यास आत्मदहन करणार असल्याचा इशारा ही या कुटुंबाने दिलं आहे. कुऱ्हाडीने मारहाण करत मारहाण केल्याचा आरोप शिक्षकाच्या नातेवाईक महादेव घुमरे यांनी केलाय. यानंतर शिक्षकाच्या गाडीवर ट्रॅक्टर घालून शिक्षकाला गंभीर जखमी करण्यात आले आणि हा अपघात दर्शविण्यात आला, असेही ते म्हणाले. बाजीराव डोईफोडे असे जखमी शिक्षकाचे नाव असून शिक्षकावर बीडच्या खाजगी रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

## राज्यात पुन्हा खांदेपालट, पाच IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या; विवेक जॉन्सन बीडचे नवे जिल्हाधिकारी

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारकडून आयएएस अधिकाऱ्यांची खांदेपालट सुरूच असून आज पुन्हा ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बढती देण्यात आली असून मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्त करण्यात आलं आहे. तर



बीड जिल्हाधिकारीपदी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा केंद्रस्थानी असून संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर बीडमध्ये पोलिस खात्यात अनेक बदल करण्यात आले. बीडच्या एसपी पदावर नवनीत कावत यांना जबाबदारी देण्यात आली होती. तर, बीड शहरातील पोलीस दलातही काही बदल करण्यात आले होते. त्यानंतर, आता बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली करण्यात आली आहे. यापूर्वी, बीडमध्ये दीप मुधोळ ह्या जिल्हाधिकारी होत्या. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर त्यांची बदली करण्यात आली होती. आता, विवेक जॉन्सन यांच्याकडे बीडची जबाबदारी देण्यात आली आहे.

### • ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

१. अभिषेक कृष्णा (आयएएस: आरआर: २००६) सदस्य सचिव, महा. जीवन प्राधिकरण मुंबई यांची संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## विधानसभा उपसभापती डॉ.नीलम गो-हे यांनी घेतला आढावा

### उसतोड कामगार नोंदणी वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

जिल्हयात उसतोड कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मात्र याबाबतची नोंदणी कमी आहे त्यामुळे या कामगारांच्या नोंदणीसह प्रधान्य द्यावे त्यासोबत या कामगारांच्या घरातील महिला आणि मुलींच्या आरोग्याची तपासणी होईल याचीही व्यवस्था करा असे निर्देश राज्य विधानसभा उपसभापती निलम गो-हे यांनी आज येथे दिले. जिल्हयातील



दौ-यात विविध विभागाच्या कामांचा आढावा त्यांनी आज घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्यासह विविध विभागाच्या प्रमुख अधिका-यांची उपस्थिती होती. यापूर्वी त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत ▶▶ उर्वरित पान २ वर

#### व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर एसटीच्या अधिकाऱ्यांसह पोलीसांना आली जाग

## बीड बसस्थानकात महिलांकडे पाहून अश्लिल कृत्य करणाऱ्या नराधमाला पोलीसांनी ताब्यात घेतले

बीड । प्रतिनिधी

येथील बसस्थानकात महिलांकडे पाहुन अश्लिल कृत्य करणाऱ्या नराधमाला पोलीसांनी आज ताब्यात घेतले असुन या प्रकरणात दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान काल दुपारी १.३० वाजता हा प्रकार घडला. त्याचवेळी प्रवाशांनी पोलीसांना बोलावले होते. मात्र एकही पोलीस कर्मचारी त्याठिकाणी आले नाहीत. शेवटी प्रवाशांनीच त्याला चोप देऊन बाहेर काढले.

बीड येथील बसस्थानकात महिला प्रवाशी निवाऱ्यात बसची वाट पाहत बसलेल्या असतांना त्याठिकाणी उभ्या असलेल्या एका नराधमाने महिलांकडे पाहुन अश्लिल कृत्य केले. सदरील प्रकारानंतर प्रवाशांनी त्याला चांगलाच चोप दिला. दरम्यान या प्रकरणात व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी आज सकाळी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात येऊन फिर्याद दिली असून त्यानंतर पोलीसांनी शंकर गिरवले नावाच्या इसमाला ताब्यात घेतले असून हा कोर्टात शिपाई असल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणात आज दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करायची प्रक्रिया सुरू होती.

## मराठी हा राज्याचा मानबिंदू

### पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य न करता ऐच्छिक राहणार – शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यात राज्यातील विद्यार्थी उद्याच्या स्पर्धेत कुठेही कमी पडू नयेत याचीही दक्षता घेतली जात आहे.



सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक असून इंग्रजी भाषा शिकविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. आता नवीन धोरण राबविताना सुकाणू समितीने घेतलेल्या निर्णयानुसार

▶▶ उर्वरित पान २ वर

### चौंडी मंत्रिमंडळ बैठकीसंदर्भातील ती जाहिरात चुकीची

मुंबई । प्रतिनिधी

चौंडी येथील प्रस्तावित मंत्रिमंडळ बैठकीसाठी सुमारे १५० कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्यासंदर्भात लोकमतमध्ये प्रकाशित जाहिरात चुकीची आहे. कॅमा आणि टिंब यात संबंधित वर्तमानपत्राने अनवधानाने गल्लत केल्याने असा प्रकार झाल्याचा खुलासा सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. दि. २१ एप्रिल रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग,

▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठवाड्यात तीन महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी संपवलं जीवन, बीडची आकडेवारी चिंताजनक

### • शासन काय उपाययोजना राबवणार?

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यात शेतकरी (ऋीशीी) आत्महत्यांचे प्रमाण थांबण्याचे नाव घेत नाही. यंदाच्या उन्हाळ्यात म्हणजेच १ जानेवारी ते ३१ मार्च दरम्यान, विभागात एकूण २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. याचा अर्थ दररोज सरासरी तीन शेतकरी आत्महत्या करत आहेत. मार्च महिन्यात सर्वाधिक १०६ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे.

या आत्महत्यांमागे मुख्यत्वे करून कर्जबाजारीपणा, शेतीचा वाढता खर्च, शेतमालाला मिळणारा अल्पभाव, नापिकी, खाजगी सावकारांकडून घेतलेले कर्ज, तसेच अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे झालेले नुकसान ही प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे बोलले जात आहे.

तीन महिन्यात २६९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या




शासनाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी काही उपाययोजना केल्या असल्या तरी त्याचा फारसा सकारात्मक परिणाम दिसून येत नाही. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जानेवारी महिन्यात ८७, फेब्रुवारीत ७६ आणि मार्चमध्ये १०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजेच तीन महिन्यात एकूण २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.

१७७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित

शासनाकडून अशा घटनांमध्ये मृत शेतकऱ्यांच्या वारसांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. आतापर्यंत ७९ प्रकरणांत ही मदत मंजूर करण्यात आली आहे, तर १३ प्रकरणे विविध कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आली आहेत. उर्वरित १७७ प्रकरणे अद्याप चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

**जिल्हानिहाय शेतकरी आत्म हत्यांचे आकडे पुढीलप्रमाणे–**

बीड – ७१
छत्रपती संभाजीनगर – ५०
हिंगोली – ३७
परभणी – ३३
धाराशिव – ३१
लातूर – १८
जालना – १३
एकूण शेतकरी आत्महत्या – २६९

▶▶ उर्वरित पान २ वर

### दहशतवाद्यांच्या गोळीबारात महाराष्ट्रातील दोन पर्यटक मृत्यूमुखी, इतर दोन जखमी


मुंबई । प्रतिनिधी

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये म हाराष्ट्रातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दिलीप डिसले आणि अतुल मोने असं या मृत पर्यटकांची नावे आहेत. तर दोन पर्यटक जखमी असून एकजण पनवेलचे असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जम्मू–काश्मीर प्रशासनातील

▶▶ उर्वरित पान २ वर



# आज जागतिक पुस्तक दिन




आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

# एल्डर लाईन - १४५६७ ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्पलाईन




गेल्या काही दशकांमध्ये वृद्धांच्या संख्येमध्ये वेगाने वाढ नोंदवली गेली आहे. सध्या, देशामध्ये सुमारे १५ कोटी लोकसंख्या ६० वर्षांपेक्षा जास्त वयाची आहे, ही देशातील एकूण लोकसंख्ये पैकी ९ % पेक्षा जास्त आहे. विविध संशोधन, कागदपत्रांनुसार, ही संख्या २०५० पर्यंत साधारण ३५ कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. भारतातील ज्येष्ठ नागरिकांची सहानुभूतीपूर्वक सेवा करून सुखी आणि निरोगी जीवन वृद्धींगत करण्यासाठी, विविध सरकारी विभाग, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, अशा अनेक वचनबद्ध भागीदारांच्या सहभागातून आवश्यक ती माहिती आणि सहकार्य करून, भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन; एल्डरलाईन– १४५६७, सर्व राज्यांत व केंद्र शासित प्रदेशात सुरु करण्यात आली आहे. सदर हेल्पलाईन राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (NISD), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये चालविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात एल्डर लाईन १४५६७ ही सेवा ऑगस्ट २०२१ पासून राबवली जात आहे. या मध्ये कनेक्ट सेंटर व फिल्ड टीम, विविध शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, विविध ज्येष्ठ नागरिक संघटना, विविध स्वयंसेवी संस्था, कायदेविषयक सल्लागार, समुपदेशक, स्वयंसेवक आदींच्या सहभागातून व मदतीने कार्यरत आहे. आज अखेर, राज्यभरातून जेष्ठ नागरिकांसाठी चार लाखाहून अधिक कॉल्स आले आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रकारे मदत हेल्पलाइन ने केली आहे. तसेच तीस हजार हून अधिक प्रकरणे क्षेत्रीय पातळीवर यशस्वीरित्या हाताळली आहेत .

हेल्पलाईनशी संबंधित अत्यंत महत्त्वाची माहिती : एल्डर लाईन साठी १४५६७ हा क्रमांक टोल–फ्री आहे. एल्डर लाईन चे कार्य आठवड्याचे सर्व दिवस (म्हणजेच रविवार ते शनिवार) सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० चालते. संपूर्ण वर्षातील ३६२ दिवस सुरू असते (फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर रोजी सुट्टी असते)

एल्डर लाईन द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा: माहिती देणे : आरोग्य विषयक जागरूकता, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण, सांस्कृतिक, कला, ज्येष्ठां संबंधी अनुकूल उत्पादने, आणि मनोरंजनाशी संबंधित माहिती.

मार्गदर्शन : कायदेविषयक (वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर दोन्ही), विवाद निराकरण (मालमत्ता, शेजारी इ.), आर्थिक, पेन्शन संबंधित सल्ला, आणि सरकारी योजनांची माहिती भावनिक समर्थन: चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित भीती निवारण, जीवन व्यवस्थापन, (वेळ, ताण, राग व्यवस्थापन) मृत्यूपूर्वीचे दस्तऐवजीकरण (मृत्युपत्र बनवण्याचे महत्व इ.)

क्षेत्रीय पातळीवर मदत: विविध सरकारी यंत्रणा, भागधारक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था यांचे मदतीने बेघर वृद्ध, अत्याचारग्रस्त ज्येष्ठ नागरिक, किंवा हरवलेल्या व्यक्तींना मदत करण्याचा प्रयत्न व त्यांना परिवाराशी पुनर्मिलन करणे साठी कार्य करणे.

एल्डर लाईन टीम विषयी : एल्डर लाईन १४५६७ ची टीम कनेक्ट सेंटर च्या माध्यमातून व जनसेवा फौन्डेशन च्या माध्यमातून संस्थापक चेअरमन डॉ. विनोद शहा, सौ.मीना शहा , श्री जयदेव नाईक व अन्य विश्वस्त तसेच महाराष्ट्र राज्य एल्डर लाईन १४५६७ चे प्रकल्प व्यवस्थापक: श्री. स्मितेश शहा, टीम लीडर : प्रियांका कांबळे, गजानन इंगळे. स्टेला काकडे, राजेंद्र आहेर यांचे सह सर्व कनेक्ट सेंटर ऑफिसर सातत्याने कार्यरत आहेत.

अधिक माहिती : एल्डर लाईन १४५६७ या हेल्पलाईन आणि तिच्या संपूर्ण भारतातील सेवांबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी वेबसाईट www.elderline.dosje.gov.in

एल्डर लाईन १४५६७ महाराष्ट्र ने प्रत्यक्ष केलेले मदत कार्याची उदाहारणे – मुंबई मध्ये सापडलेले एक ज्येष्ठ नागरिक स्मृतीभ्रंश असलेमुळे आपला घरचा पत्ता नीट सांगू शकत नव्हते, दोन महिन्यांचे पाठपुराव्यातून सदर व्यक्तीचे गुजरात मधील घर व नातेवाईक शोधले सदर व्यक्ती ३० वर्षापूर्वी घर सोडून गेल्याचे कळले आशा वृद्धास तीस वर्षानंतर परिवाराशी पुनर्मिलन करून संपूर्ण भारतात एक वेगळा आदर्श निर्माण करण्याचे कार्य एल्डर लाईन महाराष्ट्र ने केले आहे.

हैद्राबाद येथील एका मुलाने ७० वर्षीय मावशीला शिर्डी येथे देवदर्शनाला जायच्या नावाखाली मुंबई येथे सायन भागात सोडून निघून गेला. रात्र झाल्यानंतर सायन पोलिसांनी सदर आजींचा व्हिडीओ सर्वत्र पाठवल्यानंतर महाराष्ट्र टीम, सायन पोलीस, हैद्राबाद टीम ने ३६ तासाचे आत सदर आजींच्या नातेवाइकाना शोध घेतला व त्यांचे समुपदेशन करून वृद्ध महिलेच्या परिवाराशी पुनर्मिलन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

अमरावती जिल्यातील एका ज्येष्ठ नागरिक व्यक्तीला त्याची मुल त्यांना सांभाळत नाही व केस करून सुद्धा काहीच कार्यवाही झाली नाही. त्यानंतर हेल्पलाईन प्रतिनिधी यांनी पाठपुरावा करून जिल्हा प्रसासना मार्फत कार्यवाही केली व केस साठी तारीख दिली व केस सुरू झाली. यामध्ये मुलांना बोलावण्यात आहे व त्यांनी केस सुरू होण्या आधीच मुलाने मान्य केले की ते महिन्याचा आई वडिलांचा खर्च देण्यास तयार आहे. हेल्प लाईन नी त्यांची मदत केल्या मुळे हे सर्व लवकर होऊ शकले असे समस्या ग्रस्त व्यक्ती नी म्हटले व हेल्प लाईन चे आभार मानले. एल्डर लाइन १४५६७ चे कार्य सुरू झाल्यापासून त्याचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठ व्यक्तीला मोठा आधार झाला आहे. सर्व ज्येष्ठ नागरिकांना याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी एक जागरूक नागरिक या नात्याने समाजाने याचा योग्य फायदा घेणे महत्त्वाचे आहे. देशात ज्येष्ठांची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुले परदेशी वास्तव्यास असल्याने आणि मुलीचे लग्न झाल्याने घरात जेष्ठ व्यक्तींना एकटेच राहण्याची वेळ आली आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय हेल्पलाइन सक्रीय आहे व कार्यरत आहे. तरी, ही माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवावी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी जागरूकता निर्माण करावी – स्मितेश शहा, प्रकल्प व्यवस्थापक , एल्डर लाईन १४५६७ महाराष्ट्र राज्य.

पान १/४ वरून पुढे...

## राज्यात पुन्हा....

२. अविनाश पाठक (आयएएस: एससीएस: २०१३) जिल्हाधिकारी, बीड यांना व्यवस्थापकीय संचालकपदी, मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे. ३. विवेक जॉन्सन (आयएएस: आरआर: २०१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, झेड.पी., चंद्रपूर यांना बीड येथे नियुक्त करण्यात आले आहे. ४. शुभम गुप्ता (आयएएस: आरआर: २०१९) सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर यांना व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ५. पुलकित सिंग (आयएएस: आरआर: २०२१) सहाय्यक जिल्हाधिकारी, अंबड उपविभाग, जालना यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, झेड.पी., चंद्रपूर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## विधानसभा उपसभापती...

यांच्याकडून महिला सुरक्षाविषयक बाबींचा एका बैठकित आढावा घेतला. मुली विशेषत: शालेय व महाविद्यालयीन मुलींना छेडछाड करण्याचे प्रमाण वाढले आहे यातच येथील एका मुलीने धाराशिव येथे आत्महत्या केली तिच्या कुंटुंबियांशी भेट घेऊन श्रीमती गो–हे यांनी या प्रकरणी न्याय मिळवून देऊअसे तिच्या कुंटुंबियास सांगितले. सदर मुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मदतीसाठी आवाहन केले होते. त्या कुटुंबाला सांत्वनासह मदतीचे पूर्ण आश्वासन आज श्रीमती गो–हे यांनी दिले. मुलींसाठी /महिलांसाठी मदत क्रमांक– कोणत्याही प्रकारची छेडछाड अथवा इतर स्वरुपाचा त्रास दिला जात असेल तर त्यासाठी स्वतंत्र असा हरीर क्रिमांक जारी करण्यात आला आहे. ९२२५० ९२३८९ हा तो क्रमांक असून यावर सर्वांना मदत मागता येईल तसेच तक्रार करता येणार आहे. ही माहिती पोलीस अधिक्षकांनी यावेळी दिली हा क्रमांक सर्व ठिकाणी पोहचवा असे निर्देश श्रीमती गो–हे यांनी दिले.

पान १/४ वरून पुढे...

पाणीपुरवठा– जिल्हयात ग्रामीण भागातील पाणी पुरवठयासाठी बीड शहराच्या पाणीपुरवठयाबाबत यावेळी आढावा घेण्यात आला तालुक्यामध्ये ९० दिवस पुरेल इतका पेयजल साठा आहे. जलजीवन योजने अंतर्गत ९४० कामे प्रगतीपथावर आहेत तथापी याची ८०० योजनांमध्ये पाणी पुरवठा सुरु देखील झाला आहे त्यामुळे सध्या टॅकरची मागणी नाही मात्र नियोजनाचा भाग म्हणून १० विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाने केल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली. बीड शहराला पाणी पुरवठा अतिशय विलंबाने होतो त्यामुळे शहरात अधिग्रहण करुन विहिरीतून पाणी पुरवठयाचे नियोजन करा असे निर्देश श्रीमती गो–हे यांनी दिले.याबाबत प्रस्ताव पाठवा असेही निर्देश त्यांनी नगर परिषदेचे मुध्याधिकारी निता अंधारे यांना दिले. गर्भपिशवी शस्त्रक्रिया– आरोग्य विभागाने राबविलेल्या उपायांमुळे जिल्हयात ३५ वर्षाखालील स्त्रियांच्या गर्भपिशवी शस्त्रक्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. याबाबत उपसभापती यांनी समाधान व्यक्त केले. याचसोबत उसतोड महामंडळातर्फे अन्य हेळ निर्माण करुन उसतोड कामगारांच्या कुटुंबियाना आरोग्य तपासणी व इतर सुविधाबाबत प्रस्ताव करा असेही त्या म्हणाल्या.

## मराठी हा...

पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा विषय अनिवार्य करण्यात आला होता. तथापि हिंदी भाषा विषय ऐच्छिक ठेवण्याबाबतचा सुधारित शासन निर्णय काढला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले.

## चौंडी मंत्रिमंडळ...

अहिल्यानगरने एक जाहिरात प्रकाशित केली. या जाहिरातीची रिलीज ऑर्डर देताना ती दीड कोटींची असल्याचे त्यात स्पष्टपणे नमूद आहे. ती पुढारी आणि लोकमत अशा दोन वर्तमानपत्रात प्रकाशित झाली. पुढारीत ती योग्य प्रकाशित झाली आहे. पण लोकमतमध्ये शेवटच्या दोन शून्यापूर्वी

पान १/४ वरून पुढे...

असलेला टिंब काढून टाकण्यात आल्याने ती १५० कोटींची दिसते. त्यामुळे काहींनी समाजमाध्यमांवर ती टाकली आणि काहींनी त्यावर आज बातम्या प्रकाशित केल्या. वर्तमानपत्रांना दिलेला जाहिरातीचा रिलीज ऑर्डर किंवा संकेतस्थळावर ती बिनचूक आहे. केवळ एका वृत्तपत्राच्या मुद्रितशोधनाचा दोषामुळे अकारण शासनाची बदनामी करू नये. तसेच अकारण जनतेच्या मनात गैरसमज होऊ नये, यासाठी हा खुलासा प्रकाशित करावा, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे. या सोबतच यापुढे जाहिरातीत निविदा रक्कम अंकांसोबतच अक्षरी सुद्धा नमूद करावी, अशाही सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने दिल्या आहेत.

## दहशतवाद्यांच्या गोळीबारात ....

वरिष्ठांच्या संपर्कात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांना फोन करुन या हल्ल्याची माहिती घेतली. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दिलीप डिसले आणिअतुल मोने या दोघांचा मृत्यू झाला. तर इतर दोघे जमखी आहेत. जखमींमध्ये माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. तर एस भालचंद्र राव हे राज्यातील कोणत्या भागातील आहेत याची माहिती घेतली जात आहे. जी काही मदत लागेल ती मदत प्रशासन करत आहे. अशा प्रकारच्या हल्ल्याचा आम्ही निषेध करत असून त्यांचा नायनाट केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुण्यातील पाच जणांचं कुटुंब पेहेलगामला पर्यटनासाठी गेलं होतं. ज्यामधे दोन पुरुष आणि तीन महिला होत्या. अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधे एका व्हॅलीत पर्यटकांसह हे कुटुंब काश्मीरी पोषाख घालू न फोटो काढत होतं. त्यावेळी त्यांच्यासमोर अचानक दहशतवादी आले. या पर्यटकांना दहशतवाद्यांनी नावे विचारली. काही वक्तव्यं करत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. पाच जणांच्या या कुटुंबातील दोन पुरुषांवर गोळ्या झाडण्यात आल्या. यापैकी एका पुरुषाला तीन गोळ्या लागल्या असून या व्यक्तीची परिस्थिती गंभीर आहे. तर दुसरा पुरुष देखील जखमी आहे.

पान १/४ वरून पुढे...

## मराठवाड्यात तीन....

अजित पवारांचं पीक विमा योजनेवर मोठं वक्तव्य– दरम्यान, एक रुपयामध्ये पीक विमा योजना आम्ही सुरू केली होती, पण ती योजना आमच्या अडचणीत आली. त्यामध्ये खूप लोकांनी आम्हाला चुना लावला, चुनाच लावला, असं मोठं विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. ‘दिशा कृषी उन्नतीची २०२९’ या विशेष कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी पीक विमा योजनेबाबत वक्तव्य केलंय. त्यानंतर आम्ही आता सगळं काढून टाकलं आहे. आता तुमच्या भल्याचं जे असेल तेच आम्ही करणार आहोत., असेही अजित पवारांनी म्हटले आहे. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

## तारांगण व इन्क्युबेशन....

निवासस्थान या इमारती पाडल्यानंतर दोन एकर जागा मोकळी होऊ शकते तथापि उर्वरित त्तीन एकर जागा अधिगृहीत केल्यास विद्यार्थ्यांचे वसतिगृह सध्या असणारे मियावाको वन उर्वरित इमारती ज्या भविष्यात प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्लीचे मानकांनुसार व्यवसाय अभ्यासक्रमासाठी आवश्यक आहेत. या बाबी विचारात घेऊन औद्योगिक प्रशिक्षण संकुलाशेजारील जायकवाडी वसाहतीतील तीन एकर जागा तारांगणासाठी उपलब्ध करुन घेतल्यास कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचे नुकसान टाळता येऊ शकेल अशा आशयाचं निवेदन आज शिवसंग्रामच्या वतीने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना देण्यात आले.

## उपसभापती डॉ. नीलम....

ती आनंदात होती. तरीही कॉलेजमधील त्रासामुळे तिचा जीव गेला. अशा ‘टारगट मुलां’वर कठोर कारवाई व्हावी यासाठी मी स्वतः पोलिसांशी चर्चा केली आहे. कोणी आरोपीला संरक्षण देत असेल तर त्यांच्या विरोधातही कारवाई करण्यात येईल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ ऐतिहासिक मोठे निर्णय, सर्वसामान्यांना मोठा दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रालयात ही बैठक पार पडली. या बैठकीत जवळपास सर्वच नेत्यांनी उपस्थिती लावली होती. या बैठकीत आठ विविध विभागांसाठी अतिशय महत्त्वाचे आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणाच्या निर्णयाचा समावेश आहे. तसेच राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी कृषी क्षेत्रा सारखाच दर्जा देण्याचा निर्णय आजच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले ८ मोठे निर्णय :

१) ग्रामविकास विभाग : मौजे नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय. स्मारकासाठी १४२.६० कोटी तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी ६७.१७ लाख रुपयांच्या तरतूदीस मंजूरी.

२) जलसंपदा विभाग : गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प, ता. पवनी, जि.भंडारा या प्रकल्पाच्या २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या तरतूदीस सुधारित प्रशासकीय मान्यता.




३) कामगार विभाग : राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करणार

४) महसूल विभाग : विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय, ३५ हजार रुपयां ऐवजी ५० हजार रुपये मानधन मिळणार.

५) विधी व न्याय विभाग : १४ व्या वित्त आयोगामार्फत राज्यात तात्पुरत्या स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या १६ अतिरिक्त न्यायालयांना व २३ जलदगती न्यायालयांना आणखी २ वर्षे मुदतवाढ देण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता.

६) मत्स्यव्यवसाय विभाग : मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी कृषी क्षेत्रा सारखाच दर्जा देण्याचा निर्णय. मच्छिमारी, मत्स्य व्यावसायसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, सवलतीचा लाभ होणार.

७) गृहनिर्माण विभाग : पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीत बाधित झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजनेतील घरांची निर्मिती व त्यांच्या वितरणासाठीच्या धोरणात सुधारणा

८) सार्वजनिक बांधकाम विभाग : पुणे जिल्ह्यातील तळेगाव-चाकण-शिक्रापूर या राष्ट्रीय महामार्गावरील तळेगाव ते चाकण यावर चार पदरी उन्नत मार्ग व जमिनीस समांतर चार पदरी रस्ता तसेच चाकण ते शिक्रापूर यावर जमिनीस समांतर सहा पदरी रस्ता तयार करण्याचा निर्णय.

## क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्यची रो.ह.यो कामासंदर्भात बैठक संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

मादळमोही येथे क्रांती महिला असंघटित कामगार संघटनेच्या वतीने रोजगार हमी योजनाच्या कामा संदर्भात व विविध विषयी उपाययोजना संदर्भात निर्णय घेण्यात आले. बैठकीत ग्रामीण भागातील बेरोजगार,शेतमजूर आणि कष्टकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने तसेच शासकीय आणि ग्रामपंचायत स्तरावर शासकीय आणि ग्राम पंचायत स्तरावर शेतमजुरांना काम उपलब्ध करून देण्यास संबंधित अधिकारीवर्ग हलगर्जीपणा करीत असल्याने तालुक्यातील



बेरोजगारांची आणि शेतमजुरांची अवस्था अतिशय वाईट आणि बिकट आहे.यातून मार्ग काढण्यासाठी गाव पातळीवरील सक्रिय असणाऱ्या कार्यकर्त्यांसह संस्थेच्या कार्यकारी, पदाधिकारी यांनी आपापल्या गांव पातळीवर संबंधित ग्राम विकास अधिकारी,ग्राम रोजगार अधिकारी, सरपंच यांना काम मागणी अर्ज अनेकवेळा केलं.परंतु संबंधितांनी अद्यापर्यन्त टाळाटाळ केली व उडवाउडविचे उत्तर दिले.या बैठकीत रोजगाराच्या प्रश्नावर आंदोलन,दिशा कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आले.

याविषयी बैठकीत चर्चा करताना ग्राम पातळीवर शेतमजूर आणि बेरोजगारांचे अनेक प्रश्न चर्चिले गेले.ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज दाखल करून घेण्यास संबंधित ग्राम पंचायतीतील जबाबदार अधिकारी आणि पदाधिकारी टाळाटाळ करतात. अर्ज दाखल करून घेत नाहीत.परिणामी रोजगाराचा हक्क हा कायद्याच्या पुस्तकातच राहतो. त्याचा लाभ आणि फायदा गरजूंना होत नाही.या परिस्थितीवर मात करण्यासाठी या प्रश्नी व्यापक आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले.

या बैठकीस क्रांती महिला असंघटित कामगार युनियन म.रा. च्या संस्थापक अध्यक्षा शाहीन पठाण यांच्यासह शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे (बउसेसं) संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा,मनीषा शरणागत,शकुंतला घुंगासे,अंजुम पठाण,रोहिणी राउत,अलका राउत,सुवर्णा अमोल मस्के,शमशाद शेख,सयाबाई ससाणे,विलास मगरे सर हे उपस्थित होते.

## फ्रांस मधील पॅरिस मेरोथॉन मध्ये बीडच्या संतोष देशपांडे यांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

बडोदा येथे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत असलेल्या संतोष देशपांडे यांनी यंदाच्या फ्रांस मध्ये स्नायडर इलेक्ट्रिक कंपनी ने आयोजित केलेल्या मेरोथॉन ४२ किमी मेरोथॉन स्पर्धेत ५ तास १३ मिनिटे रनिंग करत यशस्वी सहभाग नोंदवला बीड शहरातील हैद्राबाद बँकेतील डी ए देशपांडे आणि सतीश देशपांडे यांचे संतोष देशपांडे हे लहाने बंधू आहेत संतोष देशपांडे गेली अनेक वर्षे देशातील विविध मेरोथॉन स्पर्धेत आपला सहभाग नोंदवत आले आहेत. यंदा प्रथमच ते इंटरनॅशनल स्पर्धेत सहभागी झाले होते या प्रसंगाची माहिती देताना बीडचा




एक धावपटू फ्रांस मध्ये जाऊन मेरोथॉन मध्ये सहभाग नोंदवतो ही घटना बीडकर जनतेला भूषणावह आहे असे संतोष देशपांडे यांचे जेष्ठ बंधू सतीश देशपांडे म्हणाले. बीड मधील अनेकांनी नातेवाईक आणि मित्र परिवाराने संतोष देशपांडे यांचे अभिनंदन केले

## घराघरात महापुरुष जन्मले पाहिजेत! -प्रा.वसंत ओगले



**बीड । प्रतिनिधी**

भैय्यासाहेब मोरे मित्र मंडळ व धानोरा रोड बीडच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीच्या आयोजन दि. १४ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आलेले होते.

या जयंती सोहळ्यास प्रा.वसंत ओगले सर, यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की घराघरातून महापुरुष जन्माला आले पाहिजेत तरच सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक लढाई यशस्वी आणि चिरंतन टिकेल.याप्रसंगी माननीय राम चांदणे ,सर, निळू भाऊ सावरगेकर ,सुप्रीडेंट ऑफ लँड रेकॉर्ड शिंदे साहेब ,माननीय नगरसेवक रणजीत बनसोडे ,कवी निर्मळ, शेळके सर, आदमने साहेब, आदींनी आपले विचार मांडले, भिवाजी जोगदंड ,राजेंद्र गालफडे सर, रमेश तुपसुंदर, लांडगे व भैय्यासाहेब मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते व धानोरा रोडवरील समस्त नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब मोरे यांनी केले तर भैय्यासाहेब मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. राजेंद्र गालफडे सर यांनी सर्वांचे आभार मानले.

## डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ अँड. मनोज संकाये यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन

**पाण्याचा वापर काटकसरीने करावा!**

**परळी । प्रतिनिधी**

शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या शुभहस्ते संपन्न यावेळी सारड गावचे माजी सरपंच आघाव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.




दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात. पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना अँड.मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे. यावेळी मंगलवार मल्टीस्टेट बँकेचे शाखा अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी , शिवा बडे, बालासाहेब चाटे,प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विधानपरिषद उपसभापती निलम गोऱ्हे यांनी पवनचक्की कंपन्यांची दहशत मान्य करत पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात तक्रार करणारे शिंदेगटाचे जिल्हाप्रमुख हयात असल्याबद्दल अभिनंदन केले : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात महिला अत्याचारांच्या घटनात या अनुषंगाने पिडीत महिलांच्या घरी भेट देऊन त्यांचे सांत्वन करून पिडीत कुटुंबियांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचा हवाला देऊन कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल असा विश्वास देणा-या एकनाथजी शिंदे गटाच्या शिवसेनेच्या नेत्या तथा महाराष्ट्र विधान परीषद उपसभापती निलमताई गो-हे यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्याची दहशत मान्य केली असुन एकनाथ शिंदे गटाच्या दोन जिल्हाप्रमुखांनी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात तक्रारी केल्याचे निदर्शनास आणुन दिल्यानंतर ते जिल्हाप्रमुख हयात असल्याबद्दल अभिनंदन केले . आणि त्यांच्या विरोधात बोलणं एवढं सोपं नसुन आम्ही साधी माणसं आहोत असं म्हणत विषयाला बगल दिली.



एकंदरीत यामुळे पवनचक्की कंपन्यांची बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर दहशत असल्याचे निलम गोऱ्हे यांनी मान्य करत हतबलता दाखवली असुन याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत भविष्यात पवनचक्की कंपन्यांची दांडगाई वाढणार असुन सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी नसल्याचे दाखवून दिले आहे.

विधानपरीषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दैनिक प्रजापत्रचे संपादक संजय मालानी यांनी निलम गोऱ्हे यांना मुख्यमंत्र्यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणारे सौर ऊर्जा प्रकल्प अनुषंगाने बीड जिल्ह्यातील सौर उर्जा कंपन्या शेतकऱ्यांच्या घरावरून नांगर फिरवत आहेत.सौर ऊर्जा कंपन्या कसलाही करार न करता पोलिस प्रशासनाची मदत घेऊन शेतकऱ्यांच्या शेतात घुसतात.कंपन्यांचे गुंड मारहाण करतात.जबरदस्तीने विद्युत तारा ओढल्या जातात. शेतकऱ्यांना शेतजमिनीचा समान भाव दिला जात नाही.प्रशासन ऐकत नाही. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयात पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात ५० च्या वरती तक्रारी पेंडीग आहेत.आपणास सकारात्मक वाटणारे प्रशासन या तक्रारीवर कारवाई करत नाही.आपण बीड जिल्ह्यातील छोट्या मोठ्या घडामोडींची दखल घेता . शेतकऱ्यांच्या घरावर नांगर फिरवला जात आहे त्याबद्दल शासनाला काही निर्देश द्याल का अथवा दखल घ्यायला भाग पाडाल का?? असा प्रश्न उपस्थित केला होता. याच वेळी दैनिक लोकमतचे बीड जिल्हा प्रतिनिधी सोमनाथ खताळ यांनी निलम गोऱ्हे यांना एकनाथजी शिंदे गटाच्या दोन जिल्हा प्रमुखांनी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात तक्रारही केल्याचे निदर्शनास आणुन दिले.तेव्हा निलम गोऱ्हे यांनी ते दोघेही हयात असल्याबद्दल अभिनंदन केले. पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात बोलणं सोपं नसुन आम्ही साधी माणसं आहोत असं म्हणत विषयाला बगल दिली. त्यामुळे एकंदरीतच निलम गोऱ्हे यांनी सुद्धा पवनचक्की कंपन्यांची बीड जिल्ह्यात दहशत असल्याचे मान्य करत हतबलता व्यक्त केल्याचे निदर्शनास आले.


**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क.३७३/२०२५**

**पुष्पाबाई व ईतर १ वि. निरंक**

ज्याअर्थी मयत क्र.१ नामे अशोक पि.कौवराजी सौंदलकर, रा. रेवकी, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ३०/१२/२०१२ रोजी रा. मौजे रेवकी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले. तसेच मयत क. २ नामे कौवराजी पि. किसन सौंदलकर, रा. रेवकी, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक १९/१०/२०२३ रोजी रा. मौजे रेवकी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) पुष्पाबाई भ्र.अशोकराव सौंदलकर, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा.रेवकी, ता. गेवराई, जि.बीड २) पांडुरंग पि. अशोक सौंदलकर, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा.रेवकी, ता. गेवराई, जि.बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयांकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत क.१ नामे अशोक पि.कौवराजी सौंदलकर, व मयत क. २ नामे कौवराजी पि. किसन सौंदलकर, दोघे रा. मौजे रेवकी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक १६/०४/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १९/०६/२०२५

**(मार्फत -ॲड. आय. बी. नागरे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## अचानक काळजाचा ठोका चुकवणारी घटना ; अमोल नाईकनवरे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन ; युवकाच्या जाण्याने पाटोद्यात हळहळ

पाटोदा । प्रतिनिधी



माळेगल्ली येथील रहिवासी व सर्वांमध्ये लोकप्रिय असलेले अमोल चंद्रकांत नाईकनवरे (वय ३५) यांचे सोमवार दिनांक २१ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटोदा शहरात व परिसरात शोककळा पसरली आहे. अमोल हे अत्यंत मनमिळावू, हसतमुख आणि समाजकार्यशील स्वभावाचे होते. त्यांच्या अकाली निधनाने नातेवाईक, मित्रपरिवार तसेच स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवारी सकाळी दहा वाजता पाटोदा येथील स्मशानभूमीत शोकमग्न वातावरणात पार पडला.

# बाजीराव चव्हाण यांच्या प्रभावी कर्तृत्वामुळे मराठवाड्यातील युवा सेनेला बारा हत्तीचे बळ



**•युवा सेना विस्तारासाठी मराठवाड्यात हजारो युवासैनिकांची फौज उभा करणार : बाजीराव चव्हाण**

**• बाजीराव चव्हाण यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे युवासेनेत युवांचा ओढा वाढू लागल्याने ;**
**•राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना भविष्यात मराठवाड्यातून अधिक बळ मिळण्याचे संकेत.!**

●राज्यातील सामान्य घरातील युवकांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून, त्यांना योग्य ती जबाबदारी देऊन. जनसामान्यांच्या सेवेसाठी, येणाऱ्या काळात युवा सेनेच्या माध्यमातून मराठवाड्यात हजारो युवकांची फौज एकनाथ शिंदे यांच्या मागे उभा करणार.

बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, शिवसेना पक्षाचे मुख्य नेते व महाराष्ट्राचे लाडके लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार, श्रीकांत शिंदे साहेब, तसेच युवासेनेचे कार्यध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब, यांच्या मार्गदर्शनाने माझ्यावर मराठवाड्याची युवासेना वाढवण्याची मोठी जबाबदारी वरिष्टांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर सोपवली आहे. त्यामुळे मी वरिष्ठांनी मला सोपवलेल्या जबाबदारीचा मी पूर्णपणे मराठवाडा युवासेना निरीक्षक पदाला मान देऊन. आपली कामगिरी कर्तव्याने पार पाडण्यासाठी मराठवाड्यात युवासेना वाढवून, गावागावात, शहरातील सामान्य घरातील युवकांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना योग्य ती जबाबदारी देऊन. जनसामान्यांच्या सेवेसाठी, येणाऱ्या काळात युवा सेना वाढवून मराठवाड्यात हजारो युवकांची फौज उभा रून राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मनगटात बारा हत्तीचे बळ देण्याच काम मराठवाड्यातील युवासेना करत आहे.

मी आदरणीय मा. एकनाथ शिंदे साहेबांचा ऋणी आहे. साहेबांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी मराठवाड्यातील युवा सेना बळकट करून सार्थ करून दाखवन्यासाठी प्रयत्नशील आहे. आणि पुढे ही मराठवाड्यातील युवासेना वाढवून. राज्यात शिवसेना, युवासेना वाढीसाठी मराठवाडा युवासेनेच्या माध्यमातून दिवसाची रात्र एक करून येणाऱ्या काळात राज्यात युवा सेना एक मोठी संघटना म्हणून ठामपणे राज्यात उभी असेल हे आमचं ध्येय आहे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी आम्ही मराठवाड्यासह महाराष्ट्रभर युवा सेनेच्या माध्यमातून दौरे करत आहोत. मराठवाड्यात युवा सेनेच्या माध्यमातून युवकांचे प्रश्न व त्यांच्या समस्या सोडविण्याचा पूर्ण प्रयत्न मी प्रमाणिकपणे करत आहे. मराठवाड्यासह राज्यात युवा सेना, मजबूत व बळकट करण्यासाठी युवकांचे प्रश्न आम्ही आमच्या माध्यमातून सोडवन्यात प्रयत्नाशील आहोत. लवकरच युवासेना ही राज्यातील लाखो युवकांचा आवाज बनून मराठवाड्यासह राज्यातील एक नंबरची संघटना करण्याचे ध्येय समोर आम्ही ठेवले आहे. राज्यातील युवकांचे शिक्षण, रोजगार, क्रीडा , सामाजिक असे सगळेच मुद्दे उचलू. सामान्य घरातील युवकांना ही राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना योग्य ती जबाबदारी देण्याचा ही प्रयत्न केला जात आहे. येणाऱ्या काळात युवा सेना ही राज्यातील सर्वात मोठी युवा संघटना बनविण्याचा माझा पूर्ण प्रयत्न राहील.आणि महाराष्ट्रात युवा सेना ही एक नंबर वर असेल. असा विश्वास युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी करमाळा या ठिकाणी पत्रकारांनी युवासेने बाबतीत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देऊ आपले पक्ष संघटने बाबत मत व्यक्त केले आहे.

## तारांगण व इन्क्युबेशन सेंटर स्वागतार्ह; पण डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृहतील विद्यार्थ्यांचे काय ? शिवसंग्राम चा सवाल



### जिल्हाधिकारी यांना शिवसंग्रामचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजना व विकास निधी २०२५-२६ अंतर्गत नाविन्यपूर्ण व शाश्वत विकास ध्येय कार्यक्रमाअंतर्गत तारांगण व इन्क्युबेशन सेंटर उभारणीची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजित दादा पवार यांनी केली असून यासाठी बीड येथील कै. विनायकराव मेटे शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, नगर रोड, बीड येथील तीन एकर जागेवर तारांगण व दोन एकर जागेवर इन्क्युबेशन सेंटर प्रस्तावित केले आहे. यासाठी येथील मुलांचे वसतीगृह आणि विविध कार्यशाळाच्या इमारती जमीनउद्ध्वस्त केल्या जाणार आहेत. त्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थी आणि या ठिकाणी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. तारांगण व इन्क्युबेशन सेंटर चे स्वागतच आहे. परंतु यासाठी योग्य जागेची निवड करण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. यासंबंधी आज शिवसंग्रामच्या शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

मा. ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतखाली दि. ०२ एप्रिल रोजी आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा वार्षिक योजनेची बैठक पार पडलेली असून सदर बैठकीमध्ये बीड जिल्हा मुख्यालयात तारांगण व इन्क्युबेशन सेंटर उभारणी करणे प्रस्तावित केले आहे. सदरील इन्क्युबेशन सेंटर बीडमधील नवउद्योजकांना मोलाचे सहाय्यभूत ठरणार आहे. या दोन कामांसाठी कै. विनायकराव मेटे शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, नगर रोड, बीड येथील तीन एकर जागेवर तारांगण व दोन एकर जागेवर इन्क्युबेशन सेंटर प्रस्तावित असून या संकुलामध्ये कै. विनायकराव मेटे शासकीय ओद्यागिक प्रशिक्षण संस्था, बीड, राणी पद्मिनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, बी. टी. आर. आय., कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ट्रायसेम कार्यशाळा या कार्यरत आहेत. त्याच बरोबर २२० विद्यार्थी क्षमतेचे वसतीगृह आहे. या वसतीगृहाचे नुतनीकरण डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह योजनेअंतर्गत करण्यात आले आहे. होणाऱ्या सेंटरसाठी वरील सर्व इमारती पाडल्या जाणार असल्याने येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कर्मचारी निवासस्थाने व प्राचार्य

▶▶ उर्वरित पान २ वर

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बीड येथील साक्षी कांबळे आत्महत्या प्रकरणी पीडित कुटुंबियांची घेतली भेट

## महाविद्यालयातील तसेच शाळेतील तरुणींना कोणी त्रास देत असेल तर त्याची गाठ महाराष्ट्र पोलिसांशी आहे : डॉ. नीलम गोऱ्हे

बीड । प्रतिनिधी



धाराशिव येथे मामाच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या साक्षी कांबळे प्रकरणात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज बीडमध्ये पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी कुटुंबीयांच्या मागण्या ऐकून घेत त्यांना मानसिक आधार दिला, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचा विश्वास दिला.

या प्रकरणातील आरोपीस जामीन मिळाल्याने कुटुंबात संतापाची लाट उसळली आहे. धाराशिव पोलीस न्यायालयात आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, एफआयआर आधीच नोंदवण्यात आला असून, आता पूरक जबाब घेतला जाणार आहे. याप्रकरणात दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल.

महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्यांबाबत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, अशा त्रासदायक प्रकारांची गाठ थेट महाराष्ट्र पोलिसांशी आहे. कोणी त्रास देत असेल, छेडछाड करत असेल तर मुलींनी तात्काळ पोलिसांकडे किंवा विश्वासू कार्यकर्त्यांकडे तक्रार करावी.

कुटुंबीयांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन, जातीय भेदभावाचे आरोप आणि कारवाईत दिरंगाईचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. डॉ. गोऱ्हे यांनी हे सर्व मुद्दे राज्याच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवले असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मी ही माहिती कळवली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले की, साक्षीचा विवाह ठरलेला होता,

▶▶ उर्वरित पान २ वर

## भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक रस्ता अडविला प्रकरणी मुळ मालका चे खरेदी खत व लेआऊट नकाशा सादर करा : चौकशी अधिकारी पारडकर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १३८ मध्ये सार्वजनिक रस्ताच अडवून पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ता रहदारीस बंद केली आहे. या प्रकरणी चौकशी अधिकारी राजेंद्र पराडकर यांनी दि ११ एप्रिल रोजी ग्रामपंचायत ची कागद पत्रे तपासणी केली व जायमोक्याचा पंचनामा करून पुरावे सादर करण्याचे ग्रामपंचायत अधिकारी यांना सूचना दिल्या होत्या परंतु सदर ग्रामपंचायत अधिकारी यांनी कोणतीही मुळ खत व दस्तावेज मिळवून येत नाहीत असे कळविले असल्याने तो प्लॉट नसून रस्ताच आहे असे सिद्ध होते असे तक्रारदार सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी म्हटले आहे

परंतु या प्रकरणी चौकशी अधिकारी राजेंद्र पराडकर यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांना आदेशाचे पत्र देऊन मुळ मालका चे मुळ खरेदी खत व लेआऊट नकाशा, दस्तावेज विनाविलंब सादर करा असे आदेश दिले असल्याने ग्रामपंचायत भाटवडगाव मधील मुळ खरेदी खत कोठे गेले असा प्रश्न उपस्थित होत आहे. सदर रस्ता अडविण्यात सध्या या कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी साहेबराव चव्हाण यांचाच हात आहे असा आरोप तक्रारदार यांनी केला आहे त्यामुळे ते चौकशी अधिकारी यांना मुळ खरेदी खत व इतर कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत असा आरोप तक्रारदार सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी केला आहे

# पोलीस उप महानिरीक्षक (नि.) अशोक धिवरे यांचा घोलप क्लासेसमधील विद्यार्थ्यांशी संवाद; गरजू विद्यार्थ्यांना केले सायकल वाटप

बीड । प्रतिनिधी



बीडच्या शिक्षण क्षेत्रामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वैचारीक वारसा चालवणारे श्री.अशोक घोलप यांच्या शिक्षण संकुलाला काल दि.२१ एप्रिल रोजी राज्याचे पोलीस उप महानिरीक्षक(निवृत्त) श्री. अशोक धिवरे यांनी भेट दिली. त्यांच्या हस्ते २० गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर इतरही अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.

श्री.अशोक घोलप यांनी सामाजिक जाणिवेतून सुरु केलेल्या घोलप क्लासेसच्या माध्यमातून आजपर्यंत ५०० हून अधिक मुला-मुलींना मोफत सायकलचे वाटप केले आहे. एव्हडेच नाही तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या असंख्य विद्यार्थ्यांना या क्लासेसमध्ये दरवर्षी मोफत शिक्षण दिले जाते. त्यामुळेच बीड शहरातील अत्यंत नावाजलेल्या या क्लासेसला मोठ्या प्रमाणात समाज मान्यता मिळालेली आहे. अलीकडे खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून जी आर्थिक नफेखोरी केली जात आहे त्यामध्ये घोलप क्लासेस अपवाद ठरले असून त्यांनी आपली आई स्व.इंदिराबाई घोलप यांच्या स्मृती प्रित्यर्थ फार मोठे सामाजिक आणि शैक्षणिक दायित्व निभावलेले आहे. दि.२१ एप्रिल रोजी बीडचे अत्यंत नावाजलेले पोलीस अधिक्षक आणि पोलीस उप महानिरीक्षक पदावरुन निवृत्त झालेले श्री.अशोक धिवरे यांनी आवर्जुन घोलप क्लासेसला भेट दिली. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी प्रामुख्याने आई-वडिलांची आहे. सलील कुलकर्णी यांच्या कवितेतील 'दमलेला बाबा' आणि वास्तवातील घराघरामध्ये दिसणारे बाबा यामध्ये खुप फरक जाणवतो. अलीकडच्या काळातील वडिलांना आपल्या मुलांवर १संस्कार घडवण्याचा नैतिक अधिकार राहिला आहे का? यावर आत्मचिंतन करण्याची गरज आहे. वडिलच खोटं बोलत असतील, चुकीचं वागत असतील , व्यसन करत असतील तर ते आपल्या मुलाला चांगले वागायला सांगू शकतील का? अलीकडच्या काळात बदललेल्या पिढीमध्ये हे वास्तव पहायला मिळते. संस्काराचा अभाव झाल्यामुळे सामाजिक चित्र बदलले. घराची कळा अंगण सांगते तसे कोणत्याही शहराची ओळख ही त्या शहरात राहणार्या नागरिकांच्या संस्कारावरुन होते. सकारात्मक विचार करा, खरे बोलायला घाबरु नका, खोटं बोलणार्यांना विरोध करा असा मौलिक सल्ला देतानाच त्यांनी एका कवितेच्या माध्यमातून माणूसकीचा राष्ट्रधर्म काय आहे? हे विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाला दै.दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक बी.एम.डिकले पाटील,पोलीस उपनिरीक्षक सुर्यकांत टाकळे,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वडमारे,इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा अर्चना झोडगे, वैशाली पाठक, तुळशीराम जगताप, राजाभाऊ धांडे, अभिमान भालेराव, राजू वडमारे, किशोर इंगोले,अनुसया फड,बाळासाहेब फड,परमेश्वर फड,आरती मस्के, मनिषा मोरे,राणी फाटक आदि उपस्थित होते.

